माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १८८२/२०२१**

**अपिलार्थी, श्री. भाऊराव झिंगूजी गोहत्रे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी,**
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नागपूर

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य),**
जिल्हा परिषद, नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २८.०८.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **अनुपस्थित** |

| **मूळ अर्जाचा दिनांक** | **जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक** | **प्रथम अपीलाचा दिनांक** | **प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक** |
|---|---|---|---|
| ०१.०३.२०२१ | निरंक | ०६.०४.२०२१ | १६.०७.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०१.०३.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "कु. धनिक्षा बंडू कानडे यांना १८ वर्ष पुर्ण झाल्याने शैक्षणिक पात्रते नुसार "अनुकंपा तत्कावर" नोकरी मिळणेबाबत इत्यादी एकुण पाच मुद्दांवर माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतीसाद दिल्याचे कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०६.०४.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "माहिती अप्राप्त आहे" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६.०७.२०२१ रोजी सुनावणी घेवून, अपिलार्थी यांना माहिती विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी, असे आदेशीत केले.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०६.०९.२०२१** रोजी "कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक **२८.०८.२०२३** रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा **सहायक प्रशासन अधिकारी** श्री. वसंता भजभुजे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक २५.०८.२०२१ रोजी विलंबान माहिती दिली असुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या आदेशात उपलब्ध असलेली माहिती प्रदान करण्याचे निर्देश दिले आहे. याच अनुषंगाने मागील तारखेला झालेल्या सुनावणी नुसार विद्यमान उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी दिनांक १२.०६.२०२३ रोजी सुनावणीच्या वेळी दिलेल्या निर्देशानुसार खालिल प्रमाणे वस्तुस्थिती सादर करण्यात येत आहे.

"कु. धनिक्षा बंडु कानडे यांनी अनुकंपा तत्वावर नौकरी मिळण्याबाबतचा अर्ज जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दिनांक १६.१२.२०२० ला प्राप्त झालेला आहे. संबंधीत विभागांनी या कार्यालयास दिनांक ०७.०१.२०२१ ला सादर केलेला आहे. त्यानुसार सन २०२२ च्या प्रतिक्षा यादी मध्ये त्यांचे नाव अनुक्रमांक १९३ वर समाविष्ट करण्यात आलेले आहे. अनुकंपा प्रतिक्षा यादीनुसार जिल्हा परिषदेमधील अंतर्गत विभाग / पंचायत समिती ला प्राप्त झालेला अर्ज दिनांक व या कार्यालयास प्राप्त झालेला दिनांक यामध्ये पडताळणी करण्यात आलेली असुन अनुकंपा प्रतिक्षा सुची मध्ये संबधिताचे नाव जेष्ठतेनुसारच दर्शविण्यात आलेले आहे.

तसेच सन २०२३ मधील अनुकंपा भरतीप्रक्रियेमध्ये जेष्ठतेनुसार कु. धनिक्षा बंडु कानडे ह्यांना परिचर पदावर (शैक्षणिक अहर्तेनुसार वर्ग-क ची पदे उपलब्ध नसल्याने परिचर या पदावर संभाव्य निवड करण्यात आलेली आहे. गट-क मधील पद उपलब्ध झाल्यानंतर गट-क मध्ये प्राध्यान्याने नियुक्ती देण्यात येईल.) संभाव्य निवड करण्यात आलेली आहे."

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★ नागपूर ★

ही बाब लक्षात घेता अपिलार्थी, यांनी देखील केलेल्या माहिती अर्जानुसार परिचर या पदावर संभाव्य निवड झाली असल्याचे सुचित केलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नसल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या मुळ मागणी नुसार कु. धनिक्षा बंडु कानडे यांच्या प्रकरणात सकारात्मक भुमीका घेत, अनुकंपा तत्वावर त्यांना नोकरी प्रदान करण्यात येत असल्याबाबत व संभाव्य निवड करण्यात आली असल्याने दिलेला प्रतीसाद इत्यादी बाब लक्षात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेली सकारात्मक भुमीका योग्य असुन उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना अपील आदेशाच्या अनुषंगाने अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती कलम २ (च) नुसार याआधीच प्रदान करण्यात आली असल्याचे आढळुन येत असल्याने, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग
सत्यमेव जयते
नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २८.०८.२०२३**

जावक क्रमांक 6L00Y दिनांक 7 DEC 2023